www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 170 वा गुरुवार दि. 06 मार्च २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले श्री. सुरेश आत्माराम भोईर

## जंजाळा किल्ल्यावर पुन्हा बहरली " धायटी"- आयुर्वेदात अत्यंत उपयोगी



**दैनिक युवक आधार प्रतिनिधी :-**
**योगेश पालोदकर सिल्लोड -**

धायटी ही बहूवर्षायू झूडुप वर्गीय वनस्पती आयुर्वेदात व जैवविविधतेच्या दृष्टीने अत्यंत उपयोगी आहे. या प्रजातीचा गड कोट, जंगलात विशेष करून अधिवास आढळतो. ५ - ६ वर्षांपूर्वी ही प्रजाती जंजाळा किल्ल्यावर राणीचा महल व किल्ल्यावरील मस्जिद च्या शेजारी मोठया संख्येने होती.या मुळे ऐतिहासिक वास्तू झाकोळली जात होती. विविध संस्था, संघटना, पुरातत्व विभाग वेळोवेळी स्वच्छता अभियान राबवितांना अनेक उपयोगी वनस्पती काढून टाकतात. जंजाळा येथे ही अशाच स्वच्छता अभियान, साफसफाई यामुळे धायटी ची बरीचशी झूडपे काढली गेली. यातच या किल्ल्यावर विदेशी व हानिकारक घाणेरी ( लँटेना) या झूडुप वर्गीय वनस्पतीने अलीकडे शिरकाव करून धायटी च्या वाढीस अटकाव केला. या गड -कोटा वनस्पती अभ्यासास गेलेल्या सिल्लोड येथील डॉ. संतोष पाटील यांना सदर झूडुप पूर्वी च्या तुलनेत खूप कमी आढळली.त्यांनी व त्यांच्या सहकारी यांनी घाणेरीचे तेथून उच्चाटन केले. गडकोट स्वच्छता करणाऱ्या संस्था, वनविभाग, पुरातत्व चे कर्मचारी, किल्ल्यावर जमीन असणारे शेतकरी यांना धायटी न काढण्याच्या विनंती वजा सूचना केल्या व सर्वांनी यास सकारात्मक प्रतिसाद दिल्याने धायटी संगोपीत झाली आहे.यावर आधारित जैवविविधता डॉ. पाटील यांनी नोंद केली आहे.

**धायटी वरील परिसंस्था***-धायटी चे शास्त्रीय नाव" वूड फोर्डीया फ्लोरीबंडा "असे असून,कॉमन सिल्वर लाइन जातीची फुलपाखरे या पानांवर अंडी घालतात व या फुलपाखरांची अळी हि पाने खाऊन वाढीस लागतात. एपीस डोरसटा, एपीस कॅरेना इंडिका व इतर मधमाशा , गांधीलमाशा हें या फुलांचा मधुर रस प्राशतात.जांभळा शिंजीर, चिमना शिंजीर, शिपाई बुलबुल, राखी वटवट्या, चिपकी, चस्मेवाला दयाळ, फुलटोच्या आदी पक्षी मकरंद शोषतात-

**धायटी महाऔषधी** -महिलांना चाळीसी नन्तर मासिक रक्तस्त्राव अधिक होणे हें हार्मोनल असुंतुलना चा परिणाम असतो. धायटी ची फुलं रक्तस्त्राव रोखनारि सिद्ध झाले आहेत. आयुर्वेदात अल्कोहोल आधारित आसवं व आरिष्ट औषधे बनविण्यासाठी हि फुलं प्राचीन काळापासून वापरतात. हि फुलं खाल्ल्यास जठरात आपोआप सेल्फ जनरेटेड अल्कोहोल निर्माण होते. गुंगी आणणारा याचा गुणधर्म आहे.या फुलांत आंबवणारा" सॅक्रोमायसेस सेरे विसी"हा मायक्रो फ्लोरा आढळतो. या सालीचा अफूचे व्यसन सोडण्यासाठी वापर आयुर्वेदात वर्णीत आहे.

**गडकिल्ल्याच्या इतिहासा सोबत जैवविविधता हि जपावी-** गडावरील ऐतिहासिक वास्तू जितक्या महत्वाच्या आहेत तितक्याच तेथील वनस्पती व वन्यजीव हें महत्वाचे आहेत. मानवी सौंदर्य दृष्टी पेक्षा जैवविविधता राखणे अगत्याचे आहे.या ठिकाणच्या वनस्पतींचे वार्षिक सर्वेक्षण होऊन तशा नोंदी ठेवणे महत्वाचे आहे म्हणून वन विभाग व पुरातत्व विभागास कळवले आहे.- डॉ. संतोष पाटील, पर्यावरण संवर्धक, सिल्लोड

## ‘उज्ज्वल निकमांच्या नियुक्तीला उशीर का केला, तर...

## मुख्यमंत्री फडणवीसांनी सांगितला नियम




संतोष देशमुख हत्या प्रकरणामध्ये विशेष सरकारी वकील म्हणून उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांची नियुक्ती करण्यासाठी सरकारने इतका वेळ का लावला? असा प्रश्न त्यांच्या नियुक्तीनंतर विरोधकांकडून उपस्थित केला गेला. विरोधकांकडून होत असलेल्या टीकेला अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिले. यावेळी त्यांनी नियुक्तीमध्ये कोणता अडथळा होता, हेही सांगितले.

राज्य सरकारकडून संतोष देशमुख हत्या प्रकरणातउज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून २५ फेब्रुवारी रोजी नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचबरोबर बाळासाहेब कोल्हे यांची सहाय्यक विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

**■ उज्ज्वल निकमांची नियुक्ती, फडणवीस काय बोलले?**

मुख्यमंत्री फडणवीस एका मुलाखतीत बोलताना म्हणाले की, “उज्ज्वल निकम आमच्या देशातील सर्वात मोठे फौजदारी वकील आहेत. त्यांच्याशी आम्ही चर्चा केली. त्यांनी होकार दिला.” पुढे बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, “त्यानंतर आम्ही उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्यास उशीर का केला, तर खटला चालवण्याच्या नियमानुसार खटल्याचा वकील हा, आरोपपत्रासाठी मदत करू शकत नाही. त्यामुळे ज्यादिवशी आरोपपत्र दाखल करण्यात आले, त्याच दिवशी आपण त्यांची नियुक्ती करू शकतो.”

**■ लोक दररोज आमच्यावर आरोप करताहेत -फडणवीस**

हाच धागा पकडत त्यांनी सांगितले, “नाहीतर तांत्रिकदृष्ट्या जे गुन्हेगार असतात. त्यांना यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिलेला आहे की, खटल्यातील वकिलाने आरोपपत्रात हस्तक्षेप केला, तर हा खटला उभा राहू शकत नाही. हे लोकांना समजत नाही. लोक दररोज आमच्यावर आरोप करताहेत. तुम्ही त्यांची नियुक्ती का केली नाही. त्यांची नियुक्ती उशिरा का केली?”, असे उत्तर देवेंद्र फडणवीस यांनी उज्ज्वल निकम यांच्या नियुक्तीबद्दल बोलताना दिले.

## पोलिस पथकावर हल्ला करुन सरकारी कामकाजात अडथळा आणले प्रकरणी गुन्हा सिध्द

### तक्रारदारास पाच लाखाची भरपाई देण्याचा निफाड न्यायालयाचा आदेश

दैनिक युवक आधार
निफाड तालुका
प्रतिनिधी राजेश भडांगे :- पोलिसांच्या ताब्यातील संशयितास ताब्यात देण्याची मागणी करत पोलिसांवर दगड फेकुन हल्ला केल्याच्या प्रकरणात जगन्नाथ संपत मोरे रा.कोकणगांव ता.निफाड यांस निफाडचे जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश मा.ए.टी.काळे यांनी दोषी ठरविले आहे. फिर्यादीस पाच लाख रु. भरपाई देण्याचा आदेश करण्यात आला आहे. सविस्तर वृत्त असे की, दि.२८ डिसेंबर २०१४ रोजी पिंपळगांव बसवंत पोलिस स्टेशनच्या गुन्ह्यातील पीडित मुलगी व आरोपी हे कळवण पोलिस स्टेशनला मिळुन आले. त्यांना ताब्यात घेण्यासाठी पिंपळगांव बसवंत पोलिस स्टेशनचे पोलिस पथक इम्रान खान, चिंतामण बोंबले, रामभाऊ मुंढे असे कळवण येथे गेले. त्यांनी आरोपीला रात्री आठ वाजेच्या सुमारास पिंपळगांव बसवंत पोलिस स्टेशनला आणले असता जगन्नाथ मोरे याने पोलिसांचे ताब्यातील आरोपीस आपल्या ताब्यात द्यावे असे म्हणुन आरडा ओरडा करत पोलिस पथकाचे दिशेने दगड फेकुन मारला असता, तो दगड पोलिस नाईक इम्रान खान यांचे डोक्याला लागुन दुखापत झाली. त्यांना तात्काळ पिंपळगांव बसवंत येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. उपचारादरम्यान इम्रान खान यांनी दिलेल्या जबाबावरुन जगन्नाथ संपत मोरे यांचे विरुध्द पिंपळगांव बसवंत पोलिस स्टेशनला भा.द.वि. कलम ३५३, ३३७, ३३२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास करुन तपास अधिकारी स.पो.नि.एस. एस.साळुंखे यांनी निफाडचे जिल्हा व सत्र न्यायालयात आरोपपत्र सादर केले. सरकार पक्षातर्फे सहा. जिल्हा सरकारी वकील रामनाथ शिंदे यांनी बाजू पहिली. फिर्यादी इम्रान खान, वैद्यकिय अधिकारी यांचेसह तपास अधिकारी असे एकुण सहा साक्षीदारांची साक्ष नोंदवत प्रभावी युक्तिवाद केला. पैरवी अधिकारी म्हणुन स.पो. उपनिरीक्षक एस.जी.शिरोळे यांनी कामकाज पाहिले. न्यायालयासमोर आलेल्या साक्षी पुराव्यावरुन आरोपी जगन्नाथ संपत मोरे यांस भा.दं. वि.कलम ३५३, ३३२ अन्वये दोषी ठरविण्यात आले. एक वर्षाचे चांगल्या वर्तणुकीबाबत बंधपत्र जिल्हा प्रोबेशन अधिकारी यांचेकडे चौदा दिवसाचे आत द्यावे व गुन्ह्यातील जखमी फिर्यादी इम्रान खान यांना भरपाई म्हणुन देण्यासाठी पाच लाख रु. न्यायालयात जमा करावेत असा निवाडा न्यायालयाने केला आहे.

## २० ते २२ मार्च पर्यंत शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात वेतन जमा करावे; - शेख अब्दुल रहीम




**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजी नगर**

मार्च अखेर कामांचे कारण न देता राज्यातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे माहे मार्च २०२५ चे वेतन रमजान ईद निमित्त २० ते २२ मार्च पर्यंत शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावे मुस्लिम समाजातील सर्व शिक्षक बांधवांची ईद गोड करावी; हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन ची मागणी!

राज्याचे शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव, शालेय शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालक यांना निवेदन सादर!

सद्या मुस्लिम धर्मातील पवित्र रमजान महिना सुरु असून एप्रिल महिन्यात अंदाजे चंद्रदर्शन प्रमाणे ३० मार्च २०२५ किंवा ३१ मार्च २०२५ रोजी मुस्लिम समाजातील मोठा सण रमजान ईद हा राष्ट्रीय सण साजरा होकार आहे. देशात मुस्लिम बांधव मोठ्या उत्साहाने ईद सण साजरा करत असतात यानिमित्त वेतन लवकर करण्यात यावे. मार्च अखेर कामांचे (Workload) कारण न देता वेतन यावेळी ३० मार्च किंवा ३१ मार्च ला रमजान ईद असल्याने वेतन प्रक्रिया गतिमान करून मार्च महिन्यातच म्हणजे २० ते २२ मार्च पर्यंत तारखेच्या आत शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात माहे मार्च महिन्याचे वेतन जमा करण्याची मागणी हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनचे राज्य प्रवक्ता शेख अब्दुल रहीम सर यांनी राज्याचे शालेय शिक्षण विभागाचे मा. प्रधान सचिव साहेब, मा. शालेय शिक्षण आयुक्त साहेब, शिक्षण संचालक प्राथमिक व माध्यमिक साहेब यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. तरी रमजान ईद या सणाचे औचित्य साधून माहे मार्च २०२५ चे वेतन ईद पूर्वी म्हणजे २० ते २२ मार्च यातारखेपर्यंत शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात जमा व्हावेत, या अनुषंगाने शासनाने तत्काळ वेतन निधी उपलब्ध करून वेतन प्रक्रिया सुरू करणेबाबत सूचना सर्व शिक्षण विभागांना देण्यात याव्यात आणि संबंधित अधिकाऱ्यांना वेतन प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याच्या अंमलबजावणीबाबत आदेश देण्यात यावे अशी विनंती करण्यात आली आहे. जेणेकरून राज्यातील तमाम मुस्लिम शिक्षक बांधवांची ईद गोड होईल...

## निफाडला माणुसकी फाउंडेशनच्या वतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने 'रणरागिणी पुरस्कार'

युवक आधार निफाड
प्रतिनिधी राहुल कुलकर्णी



निफाड :- निफाड येथील माणुसकी फाउंडेशन तर्फे जागतिक महिला दिनानिमित्त कर्तुत्वान महिलांचा 'रणरागिणी पुरस्कार' व सन्मान सोहळा आयोजित करण्यात आल्याची माहिती फाउंडेशनचे संस्थापक सागर निकाळे यांनी दिली आहे. रविवार दि.९ मार्च रोजी दु.३ वाजता निफाड येथील लासलगाव कृ.ऊ.बा.समिती सभागृहात कार्यक्रम पार पडणार असून या विशेष कार्यक्रमासाठी सुप्रसिद्ध मराठी अभिनेते संजय खापरे प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत. केवळ निफाड तालुक्यातीलच नव्हे तर जिल्हाभरातील शेती, राजकीय, सामाजिक, कौटुंबिक, धार्मिक, प्रशासकीय, उद्योजक, विधिज्ञ, उत्कृष्ठ गृहिणी यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मान होणार आहे. सन्मानार्थी परिक्षक म्हणून ज्ञानेश्वर तासकर (कवी), पत्रकार रामभाऊ आवारे, बाबा गिते, किरण आवारे, अमोल तुपे, योगेश अडसरे.किशोर पाटील. सागर आहेर. आदी सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच पत्रकार बंधूंचे सहकार्य लाभल्याने खऱ्या कर्तृत्वान महिलांचा सन्मान होणार आहे. याप्रसंगी प्रसिद्द स्त्रीरोग तज्ञ डॉ.श्रीकांत आवारे यांचे महिलांना मार्गदर्शन लाभणार आहे. तरी नागरिकांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे. माणुसकी फाउंडेशन नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर राहिले असून समाजातील विविध घटकातील कर्तृत्ववान नागरिकांचा समारंभपूर्वक सन्मान केला जातो. ऊस तोडणी कामगार असो, दुर्लक्षित घटक असो त्यांच्यासाठी फाउंडेशन नेहमीच पुढाकार घेऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्नशील आहे.

सागर निकाळे
**संस्थापक, माणुसकी फाउंडेशन, निफाड**

## उरण पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी

### संतोषसिंग डाबेराव यांचा सेवापूर्ती सोहळा.

दैनिक युवक आधार
महाराष्ट्र प्रतिनिधी

उरण पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी संतोषसिंग डाबेराव हे आपल्या 28 वर्षाच्या प्रदीर्घ सेवेतून निवृत्त झाले आहेत. त्यांचा सेवापुर्ती सत्कार सोहळा उरण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी समीर वाठारकर यांच्या अध्यक्षतेखाली दि.28 फेब्रुवारी रोजी, पंचायत समितीचे अधिकारी, कर्मचारी व ग्रामसेवकांच्या उपस्थितीत, उरण पंचायत समितीच्या कार्यालयात पार पडला . पशुवैद्यकीय अधिकारी म्हणून 27 वर्ष तर सेवेतील एक वर्ष सहाय्यक गटविकास अधिकारी म्हणून त्यांनी सेवा बजावली. अशी एकूण 28 वर्ष त्यांनी आपली सेवा बजावली. यावेळी त्यांना पंचायत समितीच्या कर्मचारी परिवारातर्फे शाल श्रीफळ व भेटवस्तू देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले तसेच याप्रसंगी उरण पंचायत समितीचे विस्तार अधिकारी विनोद मिंडे, कक्षा अधिकारी




जितेंद्र चिर्लेकर, कर्मचारी युवराज पाटील, पाणीपुरवठा विभागाचे चव्हाण, पशुधन विकास अधिकारी डॉ. सोमनाथ भोजने तसेच धाटावकर यांनी त्यांच्या कामातील प्रामाणिकपणा, जिद्द सचोटी, शांत स्वभाव व कामाबद्दलची आवड याविषयी मनोगत व्यक्त केले. तर अध्यक्षीय भाषणात गटविकास अधिकारी समीर वाठारकर यांनी त्यांच्या कार्यालयीन कामाबद्दल प्रशंसनीय उद्गार काढले. शेवटी निरोपमूर्ती संतोषसिंग डाबेराव यांनी आपल्या सेवेतील अनुभव कथन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उरण पंचायत समितीच्या कर्मचारी, अधिकारी व तालुक्यातील ग्रामसेवकांनी विशेष मेहनत घेतली.

## उरण शिवसेना (शिंदे गट) मध्ये गटबाजी उफाळली;

### संतोष देशमुख हत्येप्रकरणी निषेधाच्या वेळी दोन गट आमनेसामने

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील शिवसैनिक संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ उरणमध्ये शिवसेना (शिंदे गट) पक्षातर्फे तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. मात्र, या आंदोलनाच्या निमित्ताने उरणमधील शिवसेना (शिंदे गट) मध्ये उफाळलेली गटबाजी चव्हाट्यावर आली. एकाच पक्षाचे दोन गट वेगवेगळ्या ठिकाणी निषेध करत असल्याने अंतर्गत मतभेद स्पष्ट झाले आहेत.





संतोष देशमुख हत्येच्या निषेधार्थ तालुका प्रमुख महेंद्र पाटील आणि सुलेमान शेख यांच्या नेतृत्वाखाली उरण चारफाटा येथे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात युवा सेना सचिव रुपेश पाटील, उरण विधानसभा प्रमुख मनोज घरत, तालुका संघटक चंद्रकांत पाटील, चांजे विभागीय उपतालुका प्रमुख प्रशांत म्हात्रे, उपतालुका प्रमुख हेमंत भोईर, महिला आघाडीच्या बेबीताई पाटील यांसह असंख्य शिवसैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. तर दुसऱ्या गटाने तहसीलदार उद्धव कदम यांना निवेदन देत संतोष देशमुख हत्येतील आरोपी वाल्मिकी कराड याच्यावर कठोर कारवाईची मागणी केली. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला. या गटात उरण विधानसभा संपर्कप्रमुख रमेश म्हात्रे, तालुका संपर्कप्रमुख दीपक ठाकूर, सहसंघटक निखिल पाटील, महिला आघाडीच्या प्रणाली पाटील आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते. शिवसेनेतून फुटून शिंदे गटाने वेगळी वाट धरल्यानंतर केवळ तीन-चार वर्षांतच पक्षाच्या उरणमधील गटबाजी समोर आली आहे. विशेष म्हणजे, काही पदाधिकाऱ्यांनी दोन्ही गटांमध्ये समतोल साधण्याचा प्रयत्न केला, तर काहींनी संपूर्ण कार्यक्रमाकडे पाठ फिरवली. त्यामुळे "हे नेमके कोणाच्या बाजूने आहेत?" अशी चर्चा पक्षात सुरू झाली आहे. जर ही गटबाजी अशीच सुरू राहिली, तर शिवसेना (शिंदे गट) मधील काही पदाधिकारी पक्ष सोडण्याची शक्यता असल्याची जोरदार चर्चा उरणमध्ये रंगली आहे.



## सिल्लोड पंचायत समिती गटविकास अधिकारी रत्नाकर पगार यांनी राबविले स्वच्छता अभियान



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोडः** – दि.०४ मार्च २०२५ मंगळवार रोजी एकाच दिवशी एकाच वेळी पंचायत समिती सिल्लोड मुख्यालय, सर्व ग्रामपंचायत कार्यालय, ग्रामपंचायत अंतर्गत असलेले सर्व शासकीय कार्यालय येथे माननीय मुख्यमंत्री महोदय यांच्या शंभर दिवसांचा सात कलमी कार्यक्रमांतर्गत माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर श्री. विकास मीना व उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर श्री. राजेंद्र देसले यांच्या मार्गदर्शना खाली सिल्लोड तालुक्यातील माननीय गटविकास अधिकारी वर्ग एक पंचायत समिती सिल्लोड श्री. रत्नाकर पगार यांच्या अध्यक्षतेखाली सिल्लोड पंचायत समिती मुख्यालय व तालुका अंतर्गत असलेली ग्रामपंचायत कार्यालय, ग्रामपंचायत परिसर, सार्वजनिक स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याच्या टाक्याची स्वच्छता, शुद्ध पाण्याची व्यवस्था,अभिलेखे वर्गीकरण, कार्यालय व परिसर स्वच्छता करण्यात आली. यावेळी सहाय्यक प्रशासन अधिकारी सय्यद अथर अली, कनिष्ठ प्रशासनाधिकारी दिलीप जोहरे, उपअभियंता पाणीपुरवठा आप्पासाहेब काटकर, उपअभियंता बांधकाम अशोक शाखावर, उपअभियंता सिंचन सुभाष महाजन,पशुधन विकास अधिकारी विनोद चव्हाण, तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर नासेर पठाण, कृषी अधिकारी विश्वास बनसोड, कृषी विस्तार अधिकारी जोगेंद्र अहिरराव, राजेंद्र लांडगे, विस्ताराधिकारी शिक्षण दादाराव फुसे, विस्तार अधिकारी सांख्यिकी केवलसिंग पाटील,विस्तार अधिकारी आरोग्य समाधान जाधव, लेखा विभाग सहायक लेखाधिकारी सुनिता शिरसाठ, गणेश काथार , श्री आरुण जगदाळे, स्वच्छ भारत मिशन ग्रामीण गट समन्वयक केशवकांत बुलबुले, कनिष्ठ सहाय्यक सययद अशपाक अली,आर एम वाणी,बबन पगारे, गणेश बखळे, राजेंद्र शेळके, महेंद्र कुलकर्णी, अनिल हासे, अरुण घोलप, अमोल हजारे, योगेश मिरगे,अनिता तायडे, सोपान भालके, सुनील गावंडे,विठ्ठल गोडसे, श्रीकांत साळवे, गायकवाड, अक्षय पगार, गणेश राऊत,अशोक राऊत,राजेंद्र भोपळे,रोहीत कुलकर्णी, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक सिंचन प्रसाद ठाकरे,तसेच कार्यालयातील सर्व विभाग प्रमुख अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.तसेच राजेंद्र फलफले, सुरेश राठोड, बालिका खंडेलवाल, वंदना थोरात यांनी विशेष सहकार्य केले.

## नागोठणे लायन्स क्लब आयोजित डोळे तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबीर संपन्न

### 46 रुग्ण तपासणी; 11 रुग्ण मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पनवेल येथे रवाना

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

लायन्स क्लब आयोजित क्लबचे अध्यक्ष सुनील कुथे यांच्या सौजन्याने बबन कुथे व सावित्री कुथे यांच्या वतीने तसेच आर. झुनझुनवाला – शंकरा आय हॉस्पीटल न्यु पनवेल यांच्या विद्यमाने बाळासाहेब ठाकरे नगर मधील लायन्स क्लबच्या सभागृहात बुधवार 05 मार्च रोजी मोफत डोळे तपासणी व मोतिबिंदू ऑपरेशन शिबिर सरपंच सुप्रिया महाडिक, अड.धनंजय धारप, अड.महेश घायले,अड.दिनेश वर्मा,बबन कुथे, सावित्री कुथे, प्रकाश जैन यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजीत करण्यात आले. यावेळी अड.धारप, डॉ.अनिल गिते अड. घायले यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.सदरील शिबिराचा 46 रुग्णांनी लाभ घेतला असून त्यापैकी 11 रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी नवीन पनवेल येथे पाठविण्यात आले. यावेळी दौलत मोदी,जयराम पवार,विवेक सुभेकर, ,लायन्स क्लबचे अध्यक्ष सुनील कुथे, सेक्रेटरी डॉ.अनिल गीते, अड.स्मिता कुथे,सखाराम ताडकर, विद्या म्हात्रे, विशाल शिंदे,सिद्धेश काळे यांच्यासह क्लबचे सर्व पदाधिकारी सदस्य, आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पीटलचे डॉक्टर व त्यांचे सहकारी तसेच नागरिक उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व उपस्थितांचे आभार विवेक सुभेकर यांनी मानले.




# निखिल देठे: संकटकाळात मदतीचा हात, संस्कृती जपणारा युवा नेता

**दैनिक युवक आधार** – घाटंजी येथील एक प्रमुख व्यक्ती, निखिल राजेंद्र देठे, सामुदायिक सेवा आणि सांस्कृतिक वकिलीसाठी त्यांच्या अढळ वचनबद्धतेसाठी प्रसिद्ध आहेत. घाटंजी येथे जन्मलेला आणि वाढलेला निखिल नेहमीच त्याच्या कुटुंबाच्या परोपकार आणि सामाजिक जबाबदारीच्या वारशाने प्रेरित राहिला आहे. त्याचे वडील, जे समाजातील एक आदरणीय व्यक्ती होते, त्यांनी त्याच्यात करुणा आणि सेवेची मूल्ये रुजवली, जी निखिलच्या प्रयत्नांना मार्गदर्शन करत आहेत. लहानपणापासूनच, निखिल विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी होता. त्याने आपले शिक्षण परिश्रमपूर्वक पूर्ण केले, शैक्षणिकदृष्ट्या उत्कृष्ट कामगिरी केली आणि त्याचबरोबर सामाजिक कल्याणावर लक्ष केंद्रित करणाऱ्या अभ्यासक्रमेतर उपक्रमांमध्येही भाग घेतला. शिक्षण पूर्ण केल्यानंतर, त्यांनी वडिलांच्या कामाची जबाबदारी स्वीकारत, त्यांच्या समाजातील वंचितांच्या सेवेसाठी स्वतःला समर्पित केले.

छत्रपती महोत्सव समितीचे अध्यक्ष म्हणून, निखिल यांनी भारतीय संस्कृती आणि वारसा साजरा करणाऱ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात महत्त्वाची



भूमिका बजावली आहे. आजच्या तरुणांमध्ये लक्षणीय बदल घडवून आणण्याची शक्ती आहे असे त्यांचे मत आहे. स्वामी विवेकानंदांच्या भावनांना ते अनुसरून आहेत, ज्यांनी तरुणांना संघटित आणि सक्रिय राहण्याचे आवाहन केले होते. त्यांच्या नेतृत्वाखाली, महोत्सव केवळ सांस्कृतिक उत्सवासाठीच नव्हे तर सामाजिक समस्यांना तोंड देण्यासाठी आणि सामुदायिक ऐक्याला चालना देण्यासाठी एक व्यासपीठ बनले आहे.

निखिलचे उपक्रम सांस्कृतिक कार्यक्रमांच्या पलीकडे जातात. गरजूंना, विशेषतः संकटकाळात, आवश्यक सेवा पुरवण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली आहे. कोविड-१९ महामारी दरम्यान त्यांनी केलेले प्रयत्न कौतुकास्पद होते; त्यांनी असुरक्षित कुटुंबांना किराणा सामान आणि वैद्यकीय मदत वाटण्यासाठी संसाधने एकत्रित केली. याव्यतिरिक्त, सांगली आणि कोल्हापूरमधील विनाशकारी पुरात, निखिलने मदत कार्यात समन्वय साधला, बाधित कुटुंबांना अन्न, कपडे आणि इतर गरजा पुरवल्या.

त्यांच्या सेवेतील समर्पणामुळे त्यांना घाटंजी समुदायात आदर आणि प्रशंसा मिळाली आहे. निखिलची दृष्टी स्पष्ट आहे.

असा समाज निर्माण करणे जिथे सांस्कृतिक मूल्ये जपली जातील आणि प्रत्येक व्यक्तीला मूलभूत गरजा आणि विकासाच्या संधी उपलब्ध असतील. तो तरुणांमध्ये एकता आणि सेवेची भावना निर्माण करून, त्याच्या मोहिमेत इतरांना सामील होण्यासाठी प्रेरित करत राहतो. निखिल राजेंद्र देठे हे घाटंजीमध्ये आशेचा आणि प्रेरणेचा किरण आहेत, एका व्यक्तीची सेवेची वचनबद्धता समुदायात कसा बदल घडवू शकते याचे उदाहरण देतात. त्यांचा हा प्रवास सांस्कृतिक संवर्धनाच्या प्रभावाचा आणि परत देण्याच्या महत्त्वाचा पुरावा आहे, ज्यामुळे दयाळूपणा आणि पाठिंब्याचा वारसा येणाऱ्या पिढ्यांसाठी चालू राहील याची खात्री होते.

**सामाजिक कार्यकर्ता - निखिल राजेंद्रजी देठे**

# मराठी भाषा गौरव दिन समर्पण बहु उद्देशीय सामाजिक संस्थेकडून साजरा

### मराठी भाषा गौरव दिनानिमित्ताने कवि संमेलन आणि व्याख्यान संपन्न

**दैनिक युवक आधार**
**शहापूर वार्ताहर**

सामाजिक जनजागृती होऊन परिवर्तन व्हावे बाहेरील व जास्तीत जास्त शहापूरमधील कवींना संधी कवी संमेलनाद्वारे मिळावी म्हणून मराठी भाषा गौरव दिनानिमित्ताने धर्मवीर आनंद दिघे विद्यालय शहापूर येथे समर्पण बहुउद्देशीय सामाजिक संस्थेकडून कवी कांतिलाल भडांगे यांच्या अध्यक्षतेखाली कवि संमेलनाचे पहिले सत्र संपन्न झाले . कवितेमध्ये खूप ताकद असते, छोट्या कवितेमध्ये खूप मोठा आशय सामावलेला असतो आणि सर्व कवींच्या कविता छान होत्या असे कवी संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी आपले प्रतिपादन केले. यावेळी कवी संमेलनात संघर्षकार नवनाथ रणखांबे , जगदीश घनघाव , विजयकुमार भोईर, शाम बैसाणे, मनिषा मेश्राम , प्रतिक भडांगे, देवभाऊ उबाळे , मिलिंद जाधव, संघरत्न घनघाव, सुचिता बागडे खाडे आदी . एकूण २७ निमंत्रित कवींच्या कवितांचे बहारदार सादरीकरण झाले. शहरी आणि ग्रामीण भागातूनही कवि आणि श्रोते उपस्थित होते. कवींना प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह , सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन



सन्मानित करण्यात आले.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला म्हणून आयोजित मराठी भाषा गौरव दिनानिमित्त दुसऱ्या व्याख्यान सत्रात व्याख्याते ग वि खाडे विद्यालयाचे प्रा. दिगंबर खरात यांनी आंबेडकरी साहित्य चळवळीच्या वाटचालीस शुभेच्छा देऊन ग्रामीण भागातील कवींना संधी दिल्याबद्दल संस्थेचे अभिनंदन केले. व पी डी कारखानीस महाविद्यालय, अंबरनाथ येथील प्रा. संजय निचिते यांनी मराठीला भाषेला अभिजात दर्जा कसा मिळाला हे सांगून कवींनी व्यवस्थेला प्रश्न विचारले पाहिजेत असे यावेळी बोलतांना मत व्यक्त केले. कार्यक्रमांचे व संस्थेचे अध्यक्ष कुमार उबाळे यांनी यावेळी कवी जेव्हा कवितेला जन्माला घालतो तेव्हा तो तिचा बाप असतो तर कवितेमुळे कवी मोठा होतो तेव्हा ती त्याची आई होते असे मत मांडून संस्थेने आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या कार्याचा आणि संस्थेच्या पुढील वाटचालीचा आढावा आपल्या भाषणात घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुर्यकांत भडांगे यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार बाळाराम वाढविंदे यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कुमार उबाळे, कांतिलाल भडांगे , रामदास भोईर, सूर्यकांत भडांगे, अनंता सोनावणे, बाळाराम वाढविंदे यांनी मेहनत घेतली.

## कांजुरमार्ग येथे मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा ; पहिल्याच कार्यक्रमास रसिकांचा उस्फूर्त प्रतिसाद !!

**दैनिक युवक आधार**
**मुंबई वार्ताहर**



मागील वर्षी केंद्र सरकारकडून आपल्या मायमराठी भाषेवर अभिजात भाषेचे शिक्कामोर्तब झाले. याच मराठी भाषेचा जागर करून मराठी साहित्य, संस्कृतीशी संबंधित कार्यक्रम राज्यात साजरे केले जात असतात. दि. २७ फेब्रुवारी रोजी दरवर्षी कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांचा जन्मदिन "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून संपूर्ण राज्यात मोठ्या उत्साहात साजरा होत असतो. याच दिवसाचे औचित्य साधून विक्रोळी विधानसभा आमदार श्री. सुनिलभाऊ राऊत यांच्या प्रेरणेने आणि सहकार्याने तसेच कोकण मराठी साहित्य परिषद , भांडूप - मुलुंड शाखा आणि संतोष क्लासचे संस्थापक श्री. संतोष पासलकर सर यांच्या संयुक्त विद्यमाने "मराठी भाषा दिन" रविवार दि. २ मार्च २०२५ रोजी सायं. ५.०० वा. नवमहाराष्ट्र व्यायामशाळा, कांजुरमार्ग (पूर्व) येथे आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रम स्थळी लावण्यात आलेल्या फलकावर मान्यवर, कार्यक्रमाचे आयोजक, पदाधिकारी तसेच मराठी भाषिक यांनी "मराठीत स्वाक्षरी लेखन" करून या उपक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर प्रमुख मान्यवर यांनी ज्ञानेश्वरी, गाथा व दासबोध हे ग्रंथ हाती घेऊन ते कार्यक्रम स्थळी सन्मानपूर्वक नेण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून व मराठी ग्रंथांच्या पूजनाने करण्यात आली. त्यानंतर कु. आराध्या धोंडकर हिने शिववंदना म्हणून दाखवली. तर मराठी गौरव गीत-गौरी मयेकर यांनी सुमधुर आवाजात सादर केले. कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका व महत्व याबाबतचे प्रास्ताविक आनंद गवस यांनी केले. तसेच कोकण मराठी साहित्य परिषद ,मुलुंड शाखा अध्यक्ष प्रकाश गोठणकर यांनी मराठी साहित्य व साहित्यिकांबद्दल कोमसापची भूमिका तसेच या माध्यमातून कोकणातील कवी लेखक यांना उपलब्ध झालेले व्यासपीठ याबद्दल आपले मत व्यक्त केले. कोमसाप चे सभासद होण्याचे आवाहन यावेळी त्यांनी केले. त्यानंतर सहभागी कवी व कवीयत्रींनी आपल्या काव्यरचना सादर करुन कार्यक्रमात रंगत आणली. त्यांच्या कवितांना उपस्थित रसिकांनी दाद दिली. यावेळी प्रत्येकास पुष्प गुच्छ व पुस्तक भेट देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. या काव्यसंमेलनाचे सूत्रसंचालन कोमसापचे मुलुंड कोषाध्यक्ष श्रीकांत म्हात्रे यांनी केले. दरम्यान रुद्र जाधव व ओम शिंदे या शाळकरी मुलांनी छत्रपती शिवरायांवरील पोवाडा आपल्या खणखणीत आवाजात गाऊन उपस्थितांची वाहवा मिळवली. प्रमुख वक्ते तसेच ज्येष्ठ कवी , साहित्यिक प्राध्यापक श्री. अशोक बागवे सर यांचे व्याख्यान बहारदार झाले. मराठी भाषा गौरव दिवस, मराठी भाषेचे महत्व, मराठी साहित्यिक यांचे योगदान यावर सरांनी आपल्या ओघवत्या शैलीत भाष्य केले. मराठी भाषा जशी रांगडी आहे तसेच ती अमृता इतकी गोड सुद्धा आहे. हजारो वर्षांपासून चालत आलेली हि भाषा अभिजातच होती व आहे. फक्त तिला केंद्राकडून आता अभिजात भाषेचे प्रमाणपत्र मिळाले आहे असे यावेळी त्यांनी आवर्जून सांगितले. संवाद साधताना, बोलताना क्लिष्ट, अवघड मराठी शब्दांऐवजी साधे सोपे शब्द वापरल्याने मराठी भाषा खुलून दिसते असेही ते यावेळी म्हणाले. सरांनी केलेल्या भाषणास रसिकांनी कधी हसून.. तर कधी टाळ्या वाजवून प्रतिसाद दिला. या कार्यक्रमास मुन्सिपल कामगार सेना अध्यक्ष बाबा कदम, मा. विजय भाई तोडणकर,रविंद्र महाडिक, तानाजी मोरे, अनंत पाताडे, श्वेता पावसकर इत्यादी राजकीय नेत्यांसह सरस्वती शाळेचे मुख्याध्यापक पुंडे सर, अड. गोरखनाथ सावंत व कवी, साहित्यिक, रसिक प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संतोष सर यांनी केले व यापुढे साहित्याशी निगडीत कार्यक्रम कांजुरमध्ये होत राहतील अशी अपेक्षा व्यक्त केली. शेवटी अल्पोहार देऊन व पसायदान म्हणून कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली.

# पैठण नाथसागर धरणात अज्ञात महिलेच्या पाठोपाठ दोन ते अडीच वर्षाच्या मुलाचा मृतदेह आढळला

**दैनिक युवक आधार**
**पैठण प्रतिनिधी गौतम सोनवणे.**

पैठण जायकवाडी नाथसागर धरण परिसरात दोन ते तीन दिवसापुर्वी एका अज्ञात महिलेच्या कमरेला वजनदार दगड बांधलेल्या अवस्थेत मृतदेह आढळुन आला होता.अद्यापही त्या महीलेची ओळख पटली नसल्याने पैठण एमआयडीसी पोलीसांनी त्या महिलेची माहीती देणाऱ्यास बक्षीसही जाहीर केले आहे.आता त्या पाठोपाठ पैठण पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या नाथसागर धरण परिसरातील साखळी क्र.४२ जवळील परिसरात सोमवार दि.३/३/२०२५ रोजी



सकाळी साधारण दोन ते अडीच वर्षाच्या बालकाचे एका कापडी पिशवीत बांधलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आल्याने पुर्ण पैठण तालुक्यात खळबळ उडाली आहे. पोलीस सुत्रांकडून मिळालेल्या

## पैठण तालुक्यात उडाली एकच खळबळ .

माहीती नुसार जायकवाडी धरण नियंत्रण विभागाचे प्रमुख गणेश खरडकर यांनी पैठण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांना माहीती दिली की,नाथसागर धरणातील साखळी क्र.४२ जवळील परिसरातील पाण्यात साधारण दोन ते अडीच वर्षाच्या अनोळखी मुलाचा मृतदेह कापडाच्या पिशवीत बांधलेल्या अवस्थेत पाण्यावर तरगंतांनी दिसत आहे. तेव्हा पोलीस निरिक्षक संजय देशमुख व पोलीस उपनिरीक्षक दशरथ बुरकुल हे तात्काळ पोलीस पथकासह घटनास्थळी दाखल झाले असता त्यांना धरणाच्या पाण्यावर एका कापडात बांधलेल्या अवस्थेत साधारण दोन ते अडीच वर्षाच्या मुलाचा मृतदेह आढळुन आला,त्या मुलाच्या अंगावर निळ्या रंगाचे टि-शर्ट असल्याचे निदर्शनास आल्याने अवघ्या तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. याबाबत पैठण उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.सिध्देश्वर भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पैठण पोलीस निरीक्षक संजय देशमुख,पोलीस उपनिरिक्षक दशरथ बुरकुल,तसेठ पैठण एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सपोनी ईश्वर जगदाळे व संभाजी झिंजुर्डे हे आता दोन्ही घटनांचा परस्पर काही संबंध तर नाही ना त्या पध्दतीने पुढील तपास करत आहेत.

शनिवारी रोजी जायकवाडी नाथसागर धरणात एका अज्ञात महीलेचि बेदशीटमध्ये वतीच्या कमरेला वजनदार दगड बांधलेल्या अवस्थेत मृतदेह पोलीसांना आढळुन आला होता. दोन दोन ते तीन दिवस उलटून अद्यपही त्या महीलेची ओळख पटत नसल्यामुळे पैठण एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ईश्वर जगदाळे यांनी पोलीस ठाण्याच्या वतीने त्या महिलेची ओळख पटविनाऱ्यास बक्षीसही जाहीर केले आहे.

# चाय कॅन्टीनपासून इंस्टाग्राम स्टारपर्यंतचा प्रवास – कुलदीप बोंदाडेची प्रेरणादायी कहाणी!

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी - महेश पेंन्दोर**

यवतमाळ जिल्ह्यातील वरद (ता. राळेगाव) या छोट्याशा गावात जन्मलेला कुलदीप मोहन बोंदाडे हा संघर्ष आणि जिद्दीचं जिवंत उदाहरण आहे.आज तो केवळ एक चहा व्यावसायिक नाही,तर इंस्टाग्रामवर लाखो लोकांच्या हृदयात स्थान मिळवणारा प्रभावशाली व्यक्तिमत्त्व आहे.सध्या कुलदीप यवतमाळच्या मिलिंद सोसायटीत,संत ज्ञानेश्वर मंदिराच्या बाजूला,आपल्या ताईकडे राहतो. कठीण परिस्थितीतील संघर्ष----

२००६ मध्ये वडील मोहन बोंदाडे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. आई ताराबाई बोंदाडे मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होत्या.मोठा भाऊ आणि चार बहिणी असलेल्या कुटुंबावर आर्थिक संकट होतं. बारावीनंतर कुलदीपने ITI कोर्स केला, मात्र खाजगी नोकरीत त्याला समाधान वाटले नाही.परिस्थितीशी लढण्याचा निश्चय करून त्याने २०२३ मध्ये यवतमाळच्या तहसील चौकात 'K.B.T. पॉईंट' नावाने चहा कॅन्टीन सुरू केले. स्थानिक नागरिकांनी त्याच्या मेहनतीला दाद दिली,आणि हळूहळू व्यवसाय वाढू लागला.

■ **"सोशल मीडिया**



**– बदलाचा मंच !"**

चहा व्यवसाय सांभाळताना कुलदीपला सोशल मीडियाची आवड निर्माण झाली. तो इंस्टाग्रामवर संघर्ष,समाजप्रेरित आणि वास्तववादी रील्स बनवू लागला.त्याच्या विचारशील कंटेंटला लोकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला.

■ **अवघ्या ३-४ दिवसांत १०,००० ते १५,००० नव्या फॉलोअर्सची भर !**

प्रारंभी १००० फॉलोअर्स असलेल्या कुलदीपचा "रात्र नाही स्वप्न बदलते,दिवा नाही वात बदलते..." हा व्हिडीओ १.७ मिलियन लोकांनी पाहिला,१.८६ लाख लोकांनी लाईक केला आणि ३१,९०० लोकांनी शेअर केला.त्यामुळे त्याच्या फॉलोअर्सची संख्या १०,००० पार गेली. यानंतर "लोकांच्या गोष्टी मनावर नाही घ्यायच्या साहेब..." हा व्हिडीओ महाराष्ट्रभर व्हायरल झाला.या व्हिडीओला तब्बल ५.६ मिलियन व्ह्यूज, ५.३५ लाख लाईक्स आणि १.२८ लाख शेअर्स मिळाले. ४८ तासांतच त्याच्या फॉलोअर्समध्ये ७,००० ने वाढ झाली !

■ **१९,००० फॉलोअर्स पार करणारा विदर्भातील एकमेव इंस्टाग्राम स्टार !**

अवघ्या ३ ते ४ दिवसांत त्याच्या फॉलोअर्समध्ये १०,००० ते १५,००० ची वाढ झाली आहे.त्यामुळे सध्या त्याच्या इंस्टाग्रामवरील फॉलोअर्सची संख्या १९,००० च्या घरात पोहोचली आहे. आजच्या घडीला,यवतमाळच नव्हे,तर संपूर्ण विदर्भातील सर्वाधिक लोकप्रिय इंस्टाग्राम रील स्टार म्हणून कुलदीप बोंदाडे ओळखला जातो !

■ **व्यवसाय आणि समाजसेवेची सांगड**

कुलदीपच्या लोकप्रियतेमुळे राज्यभरातील लोक त्याच्या चहा कॅन्टीनला भेट देऊ लागले.व्यवसाय वाढला,पण त्याने समाजसेवेची तळमळ कायम ठेवली.तो दररोज ४०-५० बेघरांना मोफत चहा देतो. शाळकरी मुलांना शालेय साहित्य वाटतो. रुग्णालयातील गरजूंसाठी चहा व बिस्कीट पुरवतो.थंडीत बेघरांसाठी ब्लँकेट वाटप करतो.आजही तो चार-पाच रुपयांत चहा विकतो,तरीही दिवसाला २००० रुपये मिळवतो.

■ **संघर्षातून घडलेल्या व्यक्तिमत्त्वाचा संदेश----**

कुलदीपच्या इंस्टाग्राम बायोमध्ये शिव,फुले,शाहू,आंबेडकरांचे विचार असतात. व्यवसायाच्या पलीकडे जाऊन तो समतेचा विचार लोकांपर्यंत पोहोचवतो. त्याचं "मराठी माणूस" हे इंस्टाग्राम पेज सध्या संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय होत आहे. प्रमोशनसाठी त्याला मोठ्या ब्रँड्सकडून ऑफर्स मिळत आहेत,पण त्याने "सामान्य माणसासाठी आपल्या इंस्टाग्राम अकाउंटचा उपयोग व्हावा" हा उद्देश कायम ठेवला आहे. कुलदीपची ही वाटचाल म्हणजे "रस्त्यावरून चालणाऱ्या सामान्य माणसाने मिळवलेल्या असामान्य यशाची गोष्ट !" – एक प्रेरणादायी कहाणी,जी नव्या पिढीला संघर्ष आणि जिद्दीची खरी किंमत शिकवते !

## हयातीत घरे मिळणार नसतील तर ! ?

**किरण प्र.चौधरी. --- दहिसर, मुंबई.**

**दैनिक युवक आधार -** ' गिरणी कामगारांसाठी घरे ' अंतर्गत प्रथम मोफत घरे, मग ₹ ८ लाख, मग १/३ हिस्सा यासम प्रस्ताव बदलत गेले, बरोबरीने प्रथम मिलच्या आवारातच, मग मुंबईत करता करता मुंबईलगत पनवेल, ठाणे, वसई यासम विभागाबाहेर निर्जन ठिकाणी घरे देणार असे ' फक्त प्रसिद्धीपुरती ' जाहीर करत गिरणी कामगारांच्या तोंडाला पाने पुसली जात आहेत, आणि ते सुद्धा विशेषतः आतापर्यंतच्या प्रत्येक निवडणूकीच्या तोंडावर ! फक्त अपवाद म्हणून दीड लाख घरांच्या तुलनेत गेल्या काही वर्षांत हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या हजारभर (निकृष्ट बांधकामाच्या) घरांचे (मोबदला घेत) वाटप केले. दरम्यान प्रत्येक सत्ताधारी सरकारने आश्वासनधार्जिणी भूमिका निभावली. आजपर्यंतच्या या कालहरणात बहुतांश गिरणी कामगार सत्तरीपार वृद्धत्वाकडे झुकलेले, (काही निवर्तले), काही आपापल्या गावी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात स्थायिक झाले. शिवाय त्यांची वारसमुले आपापल्या व्यापात विखुरले गेल्याने बहुतेकांना घराची लॉटरी कोणत्या ठिकाणची व कधी लागेल याबाबत अशाश्वतता असल्याने त्यांना घर मिळण्यात स्वारस्य उरले नाही. यावर उपाय म्हणून पात्र गिरणी कामगार-वारसांपैकी ज्यांना आतापर्यंत कित्येक वर्षे मृगजळी ठरत आलेले घर घेण्यात स्वारस्य नसल्यास, त्यांच्या भरावयाच्या आर्थिक हिस्स्याची रक्कम वगळता उर्वरित रक्कम त्यांना अदा केल्यास ' ना रहेगा बाँस, ना बजेंगी बाँसुरी ' प्रमाणे, भविष्यात ना पोकळ आश्वासने (मतांसाठीही) झेलावी लागतील, ना वारंवार सव्यापसव्य करावे लागतील ; आणि महत्वाचे म्हणजे या 'आर्थिक हिस्सा ' करिता वृद्धत्वाकडे झुकलेले हयात मूळ गिरणी कामगार लाभार्थी ठरुन त्यांना त्यांच्या हयातीतच वाढत्या वैद्यकीय खर्चासाठी उपयुक्त ठरावा. ओघाने ते या जंजाळातून मुक्त होतील, शिवाय प्रशासनही त्यांच्या दायित्वातून मुक्त होईल !



**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# मंत्री माणिकराव कोकाटे यांना मोठा दिलासा, कोर्टाकडून शिक्षेला स्थगिती.

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला स्थगिती देण्यात आली आहे. नाशिक सत्र न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. त्यामुळे माणिकराव कोकाटे यांना मोठा दिलासा मिळाला आहे. माणिकराव कोकाटे यांच्यावर ३० वर्षांपूर्वी सदनिका लाटल्याचा आरोप होता. त्याचसंदर्भातील केस कोर्टात सुरू होती. कोर्टाने त्यांना २ वर्षांची शिक्षा आणि दंड ठोठावला होता. मात्र यासंदर्भात त्यांनी कोर्टात याचिका दाखल केली होती. त्यामुळे त्यांचे राजकीय भवितव्य पणाला लागले होते. आज कोर्टाच्या निर्णयावर त्यांच्या मंत्रिपदच नाही तर आमदारकीचे भवितव्य अवलंबून होते. विरोधकांनीही त्यासंदर्भात आक्रमक भूमिका घेतली होती. अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान विरोधकांनी या मुद्यावरून सरकारला धारेवर धरले होते.




त्यामुळे कोकाटे हे चहूबाजूंनी घेरले गेले होते, त्यांच्या अडचणी वाढल्या होत्या. मात्र आज नाशिक सत्र न्यायालयाकडून कोकाटे यांच्या शिक्षेला स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे कोकाटे यांनी सुटकेचा निःश्वास टाकला आहे.

**■ कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावरील आरोप..?**

माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू विजय कोकाटे यांनी '१० टक्के योजना' अंतर्गत आर्थिक दुर्बल घटकांसाठी असलेल्या घरांसाठी बनावट कागदपत्रे सादर केली, असा आरोप करण्यात आला. १९९५ मध्ये हा आरोप करण्यात आला होता. तत्कालीन अपक्ष आमदार आणि मंत्री तुकाराम दिघोळे यांनी याबाबत तक्रार दाखल केली होती. स्वतःचं घर नसल्याचं, उत्पन्न कमी असल्याचं सांगून २ घरं पदरात पाडून घेतली. इतर २ लाभार्थींना मिळालेली दोन्ही घरदेखील त्यांनी स्वतःच्या नावावर करून घेतली. घर नावावर करून घेतल्यावर अनधिकृत बांधकाम केल्याचा ठपका ठेवण्यात आला. १९९७ साली तत्कालीन अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांच्या फिर्यादीनंतर कोकाटे बंधूंसह चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. २७ वर्ष न्यायलयात खटला चालला, १० साक्षीदार तपासण्यात आले. २९ वर्षांनंतर नाशिकच्या न्यायालयाने कोकाटे आणि त्यांच्या भावाला २० फेब्रुवारी २०२५ रोजी दोषी ठरवले. त्यांना प्रत्येकी २ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा आणि ५० हजारांचा दंड ठोठावण्यात आला. नाशिक सत्र न्यायालयाने कोकाटे बंधूंच्या शिक्षेला २४ फेब्रुवारी २०२५ रोजी तात्पुरती स्थगिती दिली आणि प्रत्येकी १ लाख रुपयांच्या जामीनावर त्यांची सुटका केली. २५ फेब्रुवारी २०२५ रोजी सत्र न्यायालयात कोकाटे यांनी आपल्या शिक्षेवर स्थगिती देण्याची विनंती केली. न्यायालयाने हा निर्णय १ मार्चपर्यंत राखून ठेवला. १ मार्च २०२५ रोजी न्यायालयाने स्पष्ट केले की, मुळ कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतरच निर्णय होईल. त्या सोबतच या विरोधात हस्तक्षेप याचिका दाखल करणाऱ्यांना उच्च न्यायालयात दाद मागण्यासाठी वेळ देण्यात आला. पुढील सुनावणीची तारीख ५ मार्च निश्चित करण्यात आली होती . तर आज ५ मार्च २०२५ रोजी कोकाटे यांच्या शिक्षेवर न्यायालयाने स्थगिती दिली.

**बाईट : एडवोकेट अविनाश भिडे**
**कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांचे वकील**

## उन्हाच्या चटक्यांमुळे आरोग्यवर्धक माठाला वाढली मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

मार्च महिन्याच्या सुरुवातीला उन्हाच्या झळा हळूहळू चांगल्याच वाढू लागल्या आहेत. पनवेल तालुक्यात मागील 15 दिवसांपासून उन्हाचा पारा चढण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे गरिबांचे फ्रीज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मातीच्या माठाला दिवसेंदिवस मागणी वाढली आहे. कुंभार व्यावसायिकांच्या वर्षभर केलेल्या अपार कष्टांनंतर बनविण्यात येणाऱ्या माठांना उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणात मागणी असते. पनवेल शहरातल्या बाजारपेठेत तसेच ग्रामीण भागातल्या आठवडे बाजारात कुंभारांकडून माठाची विक्री केली जात आहे. आता तयार माठ विक्रीच्या व्यवसायात परप्रांतीयांनी देखील शिरकाव केला आहे. ते मातीचे माठ विकण्यासाठी गावागावात फिरस्ती करीत आहेत. उन्हाच्या झळा वाढू लागल्याने नागरिकांना आता थंड पाण्याची आवश्यक्ता भासू लागली आहे. दरवर्षीप्रमाणे गरिबांचे फ्रिज म्हणून ओळख असलेल्या माठाचे बाजारात आगमन झाले आहे. मात्र माठासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किमतीत काही प्रमाणात वाढ झाल्याने यंदा माठाच्या दरात सुद्धा 20 टक्क्यांची वाढ झाल्याचे माठ विक्रेत्याने सांगितले. मागील वर्षीच्या तुलनेत या वर्षी माठांची किंमत 350 ते 500 रुपयांपर्यंत पोहोचली आहे. शहरातील लहान-मोठ्या आकारातील लाल, काळ्या रंगाचे माठ, रांजण आणि नळ लावलेले माठ विक्रीसाठी दाखल झाले आहेत. त्यातच उन्हाचा कडाका वाढल्याने माठांची मोठ्या प्रमाणावर विक्री होत आहे. होळीनंतर माठांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. त्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा किमती 20 टक्क्यांनी वाढल्या आहेत. बदलत्या काळानुसार थंडगार पाण्याच्या माठाची जागा विविध प्रकारच्या साधनांनी घेतली आहे. त्यामुळे काही प्रमाणात माठ विक्रीवर परिणाम देखील झाला आहे. माठातील पाणी आरोग्यासाठी चांगले असल्याने ग्राहकांनी आता फ्रिजऐवजी ग्राहक माठाला पसंती देताना दिसत आहे. सध्या बाजारात रंगी बेरंगी माठ विक्रीसाठी उपलब्ध असून अनेक ठिकाणी नळ लावलेले माठ सुद्धा विकायला ठेवण्यात आले आहेत.





**छायाचित्र दैनिक युवक आधार - प्रतिनिधी मयूर प्रकाश धुरी**
- बीड जिल्ह्यातील सरपंच कै. संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्याकांडानंतर, मुख्य आरोपी वाल्मीक कराड आणि त्याच्या सहकाऱ्यांना फाशीची शिक्षा देण्याच्या मागणीसाठी शिवसेना माहीम विधानसभा येथे तीव्र आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात शिवसेना शिंदे गटाच्या युवा सेना कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला आणि वाल्मीक कराड यांच्या पुतळ्याचे दहन करून रोष व्यक्त केला.

## आई समाज कल्याण संस्थे तर्फे पवित्र रमजान महिन्यात अन्न धान्य वाटप

### मानवतेच्या पुण्य भावनेतून मदत म्हणून अन्न सेवा...अध्यक्ष अब्दुल हाई शेख



दैनिक युवक आधार
**पनवेल(वावंजे):-** समाजाच्या सामाजिक विकासासाठी सदैव सक्रिय असणारे शेख अब्दुल हाई म्हणजे देव माणूस , रमजान महिन्याच्या आरंभ पासुन आई समाज कल्याण संस्था - वावंजे तर्फे विविध उपक्रम राबविण्यासाठी संकल्प करताना महत्व पूर्ण अश्या संवेदनशील भावनेतून पोषक उपहार ३६ गरीब ,गरजू कुटुंबांना वाटप करण्यात आले. सबका साथ सबका विकास सबके साथ या भावनेतून सर्व धर्मियांना याचा लाभ घेता आला. समाजाच्या सामाजिक विकासासाठी देश निष्ठा सर्वोपरी हीच भावना ठेवून आल्हा चरणी आम्हाला लोकसेवा करण्याचा सामर्थ्य मिळो अशी सामूहिक प्रार्थना ही आई समाज कल्याण संस्थेच्या माध्यमातून करण्यात आली.

## श्री गजानन लीला चॅरिटेबल ट्रस्टचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेलः वार्ताहर**

श्री गजानन लीला चॅरिटेबल ट्रस्टचा वर्धापन दिन आगरी कोळी भवन नेरूळ येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे वनमंत्री श्री.गणेश नाईक उपस्थित होते. यावेळी वन मंत्री श्री.गणेश नाईक व इतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.यावेळी विद्यार्थांचा गुणगौरव व संस्थेसाठी विशेष योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करण्यात आला.श्री.गणेश नाईक यांनी संस्थेच्या सामाजिक योगदानाबद्दल व संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब देशमुख,संस्थेचे सचिव जगदीश जाधव तसेच संस्थेतील सदस्यांचे या सामाजिक कार्याबद्दल विशेष कौतुक केले व संस्थेला दहा लाख रुपयांची देणगी जाहीर केली.यावेळी कार्यक्रमाला माजी आमदार श्री. दीपक आबा साळुंखे व इतर मान्यवर उपस्थित होते.



श्री.गजानन लीला चॅरिटेबल ट्रस्ट मागील २६ वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात तसेच अनाथ,अपंग व शिक्षणापासून दुर्बल असणाऱ्या घटकांच्या शिक्षणासाठी कार्यरत आहे.तसेच या संस्थेतून गतवर्षी एक अनाथ विद्यार्थी सी.ए परीक्षा देऊन उत्तीर्ण झाला.आजपर्यंत शेकडो माध्यमिक,उच्च माध्यमिक,तंत्र शिक्षण घेऊन उत्तीर्ण झाले.राज्यातील हजारो अनाथ विद्यार्थ्यांसाठी संस्था एक आशेचा किरण आहे.

## वाल्मीक कराडचा निषेध करून त्याच्या प्रतिमेला जोडो मारो आंदोलन

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर : बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची क्रूर हत्या करतानाचे फोटो वृत्तवाहिन्यांवर प्रसारित झाल्यापासून राज्यभरात आरोपींविरोधात संतापाची लाट उसळली आहे. क्रूरतेची परिसीमा गाठलेल्या सर्व मारेकऱ्यांसोबत वाल्मीक कराडलाही पोलिसांकडून आरोपी करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर पनवेल जिल्हा शिवसेने मार्फत कळंबोली येथील मध्यवर्ती कार्यालय या ठिकाणी बुधवारी वाल्मीक कराडचा निषेध करून त्यांच्या प्रतिमेला जोडा मारून आंदोलन केले. तसेच पनवेल जिल्हा शिवसेनेच्या वतीने पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी निषेध व्यक्त केला. तदनंतर जिल्हाध्यक्ष रामदास शेवाळे यांच्या नेतृत्वात प्रांत अधिकारी पवन चांडक यांना आरोपींना कठोर शिक्षा व्हावी यासाठी निवेदन देण्यात आले. या वेळी संतोष




देखमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशी झालीच पाहिजे, अशा घोषणा या ठिकाणी देण्यात आल्या. पनवेल जिल्हा शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, रुपेश ठोंबरे, सुनील गोवारी, तुकाराम सरक, शिवाजी थोरवे, अतुल मोकल, प्रसाद परब, श्रीकांत फाळके, निलेश दिसले, संजय शेडगे, सुमित सूर्यवंशी, मंगेश शिंदे व महेश गोडसे इत्यादी युवा शिवसैनिक व रामदास शेवाळे प्रतिष्ठानचे सर्व सदस्य उपस्थित होते

## भीमशक्ती संघटना पुणे जिल्हा अध्यक्ष विजय भाऊ डोळस यांच्याकडून खेड तालुका कार्यकारणी जाहीर

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी डॉ. देवेंद्र ओहाळ**

**खेड पुणे** भीमशक्ती संघटना गेले कित्येक वर्ष खेड तालुक्यात सामान्य जनतेला न्याय देण्याची काम करत आहे लोकांचे मूलभूत हक्काची जाणीव व अन्याला वाचा फोडण्यासाठी ही संघटना कित्येक वर्ष काम करत आहे भीमशक्तीची जुनी कार्यकारणी बरखास्त करून नव्याने कार्य पुणे जिल्हा प्रमुख विजू भाऊ डोळस यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर करण्यात आली यावेळी खेड तालुका अध्यक्ष म्हणून अनिल बबन जाधव यांची निवड करण्यात आली तसेच एकनाथ भिमाजी रोकडे उपाध्यक्ष विलास बाजीराव रोकडे कार्याध्यक्ष उषा बाबुराव उनवणे महिला अध्यक्ष सारका देवेंद्र ओव्हाळ खेड तालुका पश्चिम विभाग संघटक के डी जाधव सचिव प्रसित शिवराम सुरवडे चाकण शहर अध्यक्ष दत्तात्रय चंद्रकांत गोतारणे राजगुरुनगर शहराध्यक्ष या निवड प्रक्रियेमध्ये ऋषिकेश डोळस भानुदास नितनवरे एकनाथ रोकडे अर्जुन रोकडे शंकर रोकडे आकाश घोडके इत्यादी भीमशक्ती संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते



# नांदेड येथे उद्या बायोगॅस व सहकारी दुध संस्था नोंदणी कार्यशाळा शेतकरी व नवउद्योजक तरुणांनी लाभ घ्यावा-खा. डॉ. अजित गोपछडे

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**


**नांदेड -:** मराठवाड्यासह नांदेड जिल्ह्यातील आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी, आर्थिक घडी विस्कटलेल्या शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी, शेतकऱ्यांच्या कुटुंबांना आर्थिक बळ देण्यासाठी, शेतकऱ्यांना सहकाराच्या माध्यमातून समृद्ध बनवण्याचा उद्देश समोर ठेवून आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष निमित्त सहकार से समृद्धी अंतर्गत शासनाच्या नावीन्यपूर्ण उपक्रमाद्वारे उद्या दिनांक 6 मार्च रोजी नांदेड येथील जिल्हा नियोजन भवन येथे 11 ते 4 या वेळेत बायोगॅस व दुग्ध सहकारी संस्था नोंदणी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेचा शेतकरी आणि नव उद्योजकांनी लाभ घ्यावा असे आवाहन खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केले आहे. नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना व सहकार क्षेत्राच्या माध्यमातून काम करू इच्छिणाऱ्या नवउद्योजक तरुणांना बायोगॅस व दुग्ध सहकारी संस्था नोंदणी या संदर्भात योग्य माहिती व दिशा मिळावी या हेतूने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत सहकारी संस्था( दुग्ध) छत्रपती संभाजी नगरच्या विभागीय उपनिबंधक श्रीमती कल्पना शहा व राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड (मृदा) लि. आनंद गुजरात चे कार्यकारी संचालक संदीप भारती हे मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी दीनदयाल शोध संस्थान दिल्लीचे प्रा.उपेंद्र कुलकर्णी उपस्थित राहणार आहेत तर उद्घाटक म्हणून जिल्हाधिकारी श्री.राहुल कर्डिले यांची उपस्थिती राहणार आहे . यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांची उपस्थिती असणार आहे. जिल्ह्यातील सर्व तालुका क्षेत्रातील गावातून सहकारी दुध संस्था स्थापन करण्याची ईच्छा असणाऱ्या 25 सदस्यांच्या एका समूहातील किमान दोन शेतकऱ्यांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे तसेच स्वतः च्या जागेत बायोगॅस गोबरगॅस संयंत्र बसविण्यासाठी नोंदणीकृत शेतकऱ्यांनी या कार्यशाळेत पूर्ण वेळ सहभागी व्हावे. स्वावलंबी होण्याच्या व आर्थिक उन्नतीच्या वाटेवर एक पाऊल टाकावे,असे आवाहन या कार्यक्रमाचे संयोजक पं. दीनदयाल उपाध्याय सेवा प्रतिष्ठान नांदेडचे या संस्थेचे अध्यक्ष तथा राज्यसभा खासदार डॉ.अजित गोपछडे यांनी केले आहे.




# वाढत्या उष्णतेचा आणि तापमानाचा आंबा बागायतीला फटका; कोट्यावधीचे नुकसान होण्याची बागायतदारांना धास्ती

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

आंब्याचे कोट्यावधीचे नुकसान होण्याची बागायतदारांना धास्ती वाढत्या तापमानाच्या उष्णतेने आंब्याच्या झाडावरिल कै-या गळण्याचे प्रमाण वाढू लागले आहे. तसेच कैऱ्या उन्हाने करपू लागल्याने काळ्या पडू लागल्या आहेत.आंबा बागायतीचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान होण्याची शक्यता आंबा बागायतदारांकडून वर्तविली जात आहे. रायगड जिल्ह्यात तसेच अलिबाग परिसरात उष्णतेच्या झळा वाढतच असल्याने याचा मोठा फटका संपुर्ण कोकणासह जिल्ह्यातील आंबा बागायतदारांना बसू लागला आहे. वाढत्या उष्णतेने आंब्याच्या झाडावरिल कै-या गळण्याचे प्रमाण वाढू लागले आहे. तसेच कै-या उन्हाने करपू लागल्याने काळ्या पडू लागल्या आहेत. याप्रकारामुळे आंबा बागायतदार चांगलाच धास्तावला असून यामुळे आंबा बागायतीचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान होण्याची शक्यता आंबा बागायतदारांकडून वर्तविली जात आहे.रायगड जिल्ह्यातील काही दिवस उष्णतेची लाट आल्याची परीस्थिती निर्माण झाली आहे. वाढत्या उष्णतेमुळे मनुष्य आणि वन्यजीव प्राण्यांवर मोठा विपरीत परिणाम होत आल्याचे दिसत आहे. मागील चार दिवसामध्ये उष्मा मोठ्या प्रमाणावर वाढला आहे या उष्णतेचा परिणाम आंबा बागायतीवर मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे दिसून येत आहे. प्रखर उष्णतेमुळे आंबा करपू लागला आहे. यामुळे आलेल्या कै-या काळ्या पडू लागल्या आहेत. तसेच कै-या गळून पडण्याच्या प्रमाणात देखील वाढ झाली आहे. बदलत्या वातावरणामुळे दरवर्षी आंबा व्यावसायिक



आर्थिक संकटात सापडतो. यावर्षी झालेल्या मुबलक पावसामुळे आणि पडलेल्या थंडीमुळे आंबा पीक मुबलक प्रमाणात येण्याची आशा बागायतदारांना होती. यावर्षी पावसाळा लांबल्यामुळे पालवी मोठ्या प्रमाणावर आली. डिसेंबरमध्ये थंडी पडू लागल्यावर मोहर येण्याची प्रक्रिया सुरू झाली. मात्र मोहर आल्याच्या मानाने फळधारणा कमी झाली. असे असतानाच या वर्षी आंबा पीक उष्णतेचे शिकार बनले आहे.जिल्ह्यातील बागायतदार आंबा पीक वाचविण्यासाठी धडपड करत असताना दिसत आहेत. मात्र हे प्रयत्न अपुरे पडत असल्याचे पहावयास मिळत आहेत. रायगड जिल्ह्यात सुमारे लहान मोठे पंचवीस हजारांच्या वर आंबा बागायतदार आहेत. त्यामुळे या सर्वांनाच आंबा व्यावसायात नुकसान सहन करण्याची भीती वाटू लागली आहे.नैसर्गिक संकट आणि उष्णतेमुळे आंबा उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. यावर्षी आंबा पिकाचे उत्पादन २० ते १५ टक्क्यावर येण्याची शक्यता आंबा व्यावसायिकांनी वर्तविली आहे. वाढत्या उष्णतेवर आंबा व्यावसायिकांकडे कोणताच उपाय नसल्याने यावर्षी आंबा बागायतीदारांना कोठ्यावधी रुपयांचा फटका बसणार आहे. तसेच आंबा उत्पन्न कमी झाल्यास उपलब्ध आंबा फळाचा दर ही वाढणार आहे.आंबा बागायत आता दरवर्षी आर्थिक संकटात सापडत आहे. आशेवर आता आंब्याचा व्यावसाय करावा लागत आहे. मात्र असेच चालत राहिल्यास आंबा उत्पादन घेणे कठिण होणार आहे. महाराष्ट्र शासनाने याकडे लक्ष देण्याची गरज आहेअसे आंबा बागायतदार मध्ये चर्चा जोरदार चालू आहे.

## शिवसेना करंजाडे वडघर विभागाच्या वतीने

### कै.संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी जाहीर निषेध




**दैनिक युवक आधार**
**रुपेश राजे**
**करंजाडे प्रतिनिधी**

दिनाक ०५ बुधवार मार्च २०२५ रोजी शिवसेना पनवेल ग्रामीण व शिवसेना करंजाडे वडघर विभागाच्या वतीने सकाळी १० वाजता कॉलेज फाटा, दुधे विटेवरी सोसायटी समोर करंजाडे येथे शिवसेना शिंदे गटाच्या वतीने बीड जिल्हा येथे कै.संतोष देशमुख यांच्या हत्या कांडातील आरोपी वाल्मीक कराड व ईतर हल्ले खोर यांच्या वर लवकरात लवकर खटला चालवून दोषींना फाशीची शिक्षा द्यावी.या साठि आंदोलन करण्यात आले त्या करिता उपस्थित पनवेल तालुका प्रमुख श्री.रघुनाथ दादा पाटील, तालुका संपर्क प्रमुख श्री. बाळासाहेब नाईक, उप तालुका प्रमुख श्री.चंद्रकांत गुजर, करंजाडे विभाग प्रमुख श्री.बाळासाहेब आवारी, करंजाडे शहर प्रमुख श्री.हितेश नाईक, श्री.विष्णु लहाने,श्री.सुधीर पाटील,श्री. गौरव दादा गायकवाड, श्री.कैलास पायमोडे, श्री. अर्जुन पवार,श्री.विक्रम मोरे, श्री.विनोद सिरवि,कु.दिनेश डुकेव्हाल, श्री. अजय डुकेव्हाल, श्री.हितेश काका गायकवाड व सर्व शिवसैनिक उपस्थित होते.

# चुकिला माफी नाही, पोटच्या गोळ्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

## विद्युत उपकरणांची चोरी करणारा मुलगा व नातु यांच्या विरोधात पोलीस ठाण्यात धाव...

दैनिक युवक आधार



पाटोदा (प्रतिनिधी) - सत्यासाठी काय पण ही मन मोठी प्रचलित असुन अनेक वेळा ती संबोधली जाते मात्र काही वेळा प्रकरण स्वतः वर आल्यानंतर त्यातून काडतापाय घेतल्याचे दिसून येते मात्र पोटच्या गोळ्याची चुक पोटात न घेता गुन्हा दाखल करण्याची मागणी आजतागायत कुणीच केली नसेल परंतु अस घडलं आहे पाटोदा तालुक्यातील चुंबळी या गावात, पाटोदा शहरापासून काही अंतरावर असलेल्या चुंबळी येथील रहिवासी ह.भ.प.पांडुरंग गोविंदराव पवळ हे अध्यात्मिक क्षेत्रात कार्यरत असल्याने किर्तन, प्रवचन, व्याख्यान आदी धार्मिक, पारमार्थिक कार्यात व्यस्त असल्याचे संधी साधून त्यांच्या मुलाने व अल्पवयीन नातवाने गावाच्या परिसरातील विहिरीतील विद्युत साहित्याची चोरी करून मुद्देमाल आपल्या घरात लपवून ठेवला होता. मात्र याची काडीमात्र कल्पना ह.भ.प.पांडुरंग पवळ यांना नव्हती दिनांक ०३/०३/२०२५ रोजी गावातील काही नागरिक महाराजांच्या घरी आले चौकशी केली असता महाराजांच्या मुलाने व नातवाने साहित्य आणल्याची कबुली दिली. त्या वेळी ह.भ.प.पांडुरंग पवळ यांनी माझ्या पोटच्या गोळ्यालाच चांगले संस्कार देऊ शकलो नाही त्या मुळे तुम्ही त्यांच्या बरोबर माझ्यावरही गुन्हा दाखल करा अशी विनवणी केली. परंतु ग्रामस्थांनी या गोष्टीला स्पष्ट नकार दिला व मुद्देमाल घेऊन निघून गेले. मात्र घडलेल्या घटनेमुळे व्यथित होऊन ह.भ.प.पांडुरंग पवळ यांनी पाटोदा पोलीस ठाणे गाठुन पोटच्या गोळ्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. या घटनेने स्वतःच्या मुलाच्या व नातवाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी करणारे पवळ महाराज हे पहिलेच उदाहरण ठरतील का? या वर परिसरात जोरदार चर्चा सुरू आहे.

# दुचाकी चोरीचा तपास लावण्यात निफाड पोलिसांची यशस्वी कामगिरी

## मोबाईल व दुचाकी चोर अवघ्या २४ तासात पोलिसांनी केले जेरबंद

**दैनिक युवक आधार**
**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक:**
**विनोद गायकवाड**




निफाड पोलीस ठाण्याच्या हद्दीतून चोरी गेलेल्या मोटरसायकल चा २४ तासात तपास लावण्यात निफाड पोलिसांना यश आले असून या प्रकरणात एक विधी संघर्षित बालकाचा सहभाग असल्याचा संशय आला आहे, चौकशी दरम्यान इतरही गुन्ह्यांचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागले आहेत,

याबाबत निफाड पोलिसांकडून मिळालेल्या अधिक माहितीनुसार दिनांक २० फेब्रुवारी २०२५ रोजी निफाड तालुक्यातील पिंपळस रामाचे येथून एक प्लेटिना दुचाकी चोरी गेली होती या प्रकरणी तपास काम सुरू असताना घटनास्थळाच्या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरा तपासणी करताना सदर गुन्ह्यांमध्ये एक विधी संघर्षित बालकाचा हात असल्याचे लक्षात आले. सदर विविध संघर्षित बालकाची चौकशी केली असता निफाड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दोन मोटरसायकल आणि ओझर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एक मोटरसायकल यांच्या चोरीचा छडा लागला आहे एम एच १५ जी वाय ३४ ३२, एम एच १५ डी ९३ ५५, एम एच १५ ९५,या क्रमांकाच्या तीन दुचाकी दोन मोबाईल हँडसेट आणि २५० रुपयांची नाणी असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे ,मोटरसायकल चोरीची फिर्याद दाखल झाल्यानंतर २४ तासाच्या आत तपास करून गुन्ह्याचा यशस्वी शोध लावण्याचे उल्लेखनीय काम निफाड पोलीस पथकाने बजविले आहे नाशिक जिल्हा ग्रामीण पोलीस चे अधीक्षक विक्रम देशमाने, अप्पर अधीक्षक आदित्य मिरखेलकर, निफाडचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉक्टर निलेश पालवे, आणि निफाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव, यांच्या मार्गदर्शनाखाली तपासी अंमलदार साळवे, खरात, ढिकले सांगळे, दरोडे, गायकवाड, विकास जाधव, विनोद जाधव, जाधव आणि सागर जाधव, यांनी तपास कामी परिश्रम घेतले,

# सापडलेले मंगळसूत्र चिमुकल्याने केले परत..!



**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

रेल्वे पोलीस आयुक्तालयातील व पनवेल रेल्वे पोलीस ठाणे येथे कार्यरत असणारे पोलिस कर्मचारी सोमनाथ इंगवले यांचा मुलगा नितेश सोमनाथ इंगवले हा कामोठे येथे क्लासला जात असताना सेक्टर ३४ कामोठे येथे त्याला एक पर्स मिळून आली त्या पर्समध्ये जवळपास अडीच तोळे सोन्याचे मंगळसूत्र होते, हे सोन्याचे दागिने पहिल्या नंतर, नितेश याने या पर्सची माहिती घरी वडील आणि आईला दिली, ही माहिती मिळाल्या नंतर हे दागिने स्वतः कडे न ठेवता , नितेश चे वडील सोमनाथ इंगवले आणि मुलगा नितेश यांनी जवळील कामोठे पोलिस ठाण्यात जाऊन सापडलेल्या दागिन्यांची माहिती कामोठे पोलिसांना दिली आणि हे सोन्याचे मंगळसूत्र कामोठे पोलिसांच्या ताब्यात दिले, त्या नंतर कामोठे पोलिसानी मंगळसूत्र हरवलेल्या महिलेचा शोध लावला आणि महिलेची अधिक चौकशी तसेच खात्री करून ते सोन्याचे मंगळसूत्र त्या महिलेला परत केले. हे सोन्याचे मंगळसूत्र पाहून महिलेने नितेश इंगवले याचे आभार मानले, आणि चांगले कार्यकेल्या बद्दल कामोठे पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी नितेश इंगवले याचे कौतुक करून त्याच्या कार्याचा सत्कार केला.

# शिवसैनिकांनी जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करून घ्यावी – जिल्हाअध्यक्ष संजय काळे

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**



शिवसेनेचे मुख्य नेते तसेच राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या आदेशान्वये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे राबवण्यात येत असलेले शिवसेना सदस्य नोंदणी अभियाना संदर्भात इंदापूर येथे जिल्हाअध्यक्ष संजय काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत तालुक्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक दि.3 मार्च रोजी संपन्न झाली. बैठकीत संजय काळे हे मागदर्शन करत असताना शिवसेना पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी तसेच तालुक्यातील प्रत्येक गाव खेड्यांतील कानाकोपऱ्यांमध्ये शिवसेनेचा भगवा फडकवणे या उद्देशाने शिवसेना सदस्य नोंदणी अभियान राबवावे असे आवाहन यावेळी सर्व उपस्थितांना केले. या बैठकीला तालुक्यातील उस्फुर्तपणे काम करणारे शिवसैनिक व महीला आघाडीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उरण तालुक्यातील विशाखा पाटील यांच्या अप्रतिम फॅशन शो ने उरणकर भारावले.

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

उरण एमपी हॉलमध्ये मंगळवार दि.४ फेब्रु २०२५ रोजी उरणच्या सुप्रसिद्ध कलाकार विशाखा पाटील (पागोटे ) यांनी ३० पेक्षा जास्त कलाकार घेऊन अप्रतिम फॅशन शो संपन्न केला.या शोचे उद्घाटन द्रोणागिरी स्पोर्टसचे अध्यक्ष महादेव घरत यांच्या हस्ते झाले. यावेळी रायगडभूषण प्रा एल बी पाटील, मिसेस इंडिया क्वीन स्वेता राजकुमार,उप सरपंच करिश्मा पाटील,सुनिता पाटील,आदिराज पाटील, प्राजक्ता पाटील ,समृध्दी पाटील, महेश पाटील,सतीश पाटील ,इत्यादी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी महादेव घरत म्हणाले की उरणमधील हा शो मोठ्या स्वरूपात होत असून पागोटे गावच्या तरुणीने फार मोठे आणि यशस्वी पाऊल उचलले आहे.स्वेता राजकुमार यांनी फॅशन डिझायनर विशाखासह इतर कलाकारांना मार्गदर्शन करताना सांगितले की तरुणाईसाठी फॅशन शो, मॉडेल ही चांगली क्षेत्रेअसून त्यामध्ये सहभागी व्हावे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतीश पाटील यांनी अतिशय लाजबाब करून देखणा आणि रेखीव शो केला.शोसाठी प्रेक्षकांची मोठी उपस्थिती होती. ऋषिकेश पाटील आणि मित्रांनी उत्तम आयोजन केले.प्रेक्षकांची मोठी दाद उपस्थिती पाहून विशाखा पाटील यांनी सर्वांचे आभार मानले.



# पळस फुलला.... !



बालपण, निसर्ग आणि सण... बालपण आणि रंगपंचमी: बालपण म्हणजे निरागसपण.. बालपणीच्या आठवणींमध्ये अनेक सणांचे रंग मिसळलेले असतात, पण त्यातही होळी आणि रंगपंचमी हा विशेष आनंद देणारा सण ठरतो. या सणात रंगांची उधळण होते आणि बालपणीचे दिवस अधिक रंगीबेरंगी बनतात. काही ठिकाणी होळीच्या दुसऱ्या दिवशी रंगपंचमी साजरी करतात.. एकमेकांना रंग लावून आपल्या आयुष्यात पण असे रंगबेरंगी क्षण यावेत अशी कामना करतात परंतु धुलीवंदन आणि रंगपंचमी वेगवेगळ्या आहेत असो....

पूर्वीच्या काळी रंगपंचमीच्या रंगांसाठी नैसर्गिक घटकांचा वापर होत असे. त्यात महत्त्वाचे स्थान होते पळसाच्या फुलांना. या फुलांपासून तयार होणाऱ्या रंगांचा लालसर-केशरी छटा हा अत्यंत मोहक आणि सुरक्षित असायचा मी लहान होतो तेव्हा पळसाचे फुले रंगपंचमीच्या पाच सहा दिवस अगोदरच जमा करायचो त्यात ही पळसाचे जवळ एकच झाड असल्याने आम्हा मुला मधील जो कोणी अगोदर जमा करायचा त्याला निश्चित फुले मिळायची.. पळसाचे फूल आणि त्याचा रंग कसा तयार करायचो.. पळसाच्या फुलांना उन्हात वाळू घालायचो, ती कुरकुरीत झाली की हातात घेऊन दाबली की बारीक होतात ती बारीक करायचो किंवा रंगपंचमीच्या आधल्या दिवशी गरम पाण्यात ते फुले बारीक न करता टाकायचो दुसऱ्या दिवशी लालसर -केशरी रंग तयार होत होता.. दुसरा दिवस उजाडून रंगाची उधळण कधी होईल याची वाट बघायचो..हा रंग मात्र नैसर्गिक असल्याने त्याचा त्वचेवर शरीरावर विपरीत परिणाम होत नसे आणि सहज निघून जायचा.. जसे दिवस गेले तशा रंगपंचमी खेळायचे आणि रंगाची पद्धत पण बदलली.. (आधुनिक शेती तंत्रज्ञान) यात रासायनिक कलर, सिल्वर अल्युमिनियम सारखा वार्निश पेंट, वंगण आणि बरेच काही पण ते अंगाचे सात, आठ दिवस काही जात नव्हते.. हळूहळू त्याचे त्वचेवर नुकसान पाहून हे नुकसानकारक वापरणे कमी झाले आता कलर येतात कोरडे किंवा पाण्यात मिक्स करून वापरायचे...

**-लेखक-**
**गोकुळ सानप(पत्रकार) रायमोहाकर..!**

**बालपणातली रंगपंचमी आणि पळसाचे रंग:**
पूर्वी रंगपंचमीला रासायनिक रंग नव्हते, म्हणूनच पळसाच्या फुलांपासून तयार केलेले रंग वापरण्यात येत. लहान मुले अंगणात, मैदानात आणि रस्त्यावर रंगांची उधळण करत असत. हातात रंग भरलेल्या पिचकाऱ्या आणि चेहऱ्यावर आनंदाची लाली असायची. अन् त्या पिचकाऱ्याही वडिलांच्या खूप मागे लागून घ्यायचो नाहीतर असेच मागील वर्षाची पिचकारी नैसर्गिक रंग असल्यामुळे पालक ही निर्धास्त असायचे.

==================================

**आजची रंगपंचमी आणि रासायनिक रंगांचा धोका**
आजच्या काळात रासायनिक रंगांचा वापर वाढल्यामुळे त्वचेच्या आणि डोळ्यांच्या समस्याही वाढल्या आहेत. या कृत्रिम रंगांमध्ये धातूंचे मिश्रण असते, जे शरीरासाठी हानिकारक ठरू शकते. त्यामुळे आजही काही लोक नैसर्गिक रंगांचा आग्रह धरतात.

==================================

**पळसाच्या फुलांचे महत्त्व पुन्हा जपले पाहिजे**
जर आपण हळूहळू पुन्हा एकदा नैसर्गिक रंगांकडे वळलो आणि रंगपंचमी अधिक आरोग्यदायी होऊ शकते.
पळसाची झाडे पडीक जागेवर लावली तर नैसर्गिक रंग मिळतील.
लहान मुलांना नैसर्गिक रंगांची ओळख करून द्यावी, जेणेकरून त्यांचे आरोग्यही सुरक्षित राहील.

# अवैध्य रेती वाहणावर महसूल पथकाची कारवाई -१ लाख ४४ हजार रु. दंड आकारला..

## मराठवाड्यातील अका पकडला लोणार शहरातील फरार का सोडला त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा अन्यथा कारवाई करण्यात यावी

**दैनिक युवक आधार**
**संदीप मापारी पाटील बुलढाणा**


-पोलीस स्टेशन लावलेले वाहन

**लोणार** - मराठवाड्यातील पूर्णा नदीपात्रातून तळणी मार्गे लोणार कडे अवैध्य रेती वाहतूक करणारे टिप्पर महसूल विभागाच्या पथकाने दंडात्मक कारवाई साठी ताब्यात घेतल्याची घटना दि. ३ मार्च रोजी संध्याकाळी ९ वाजेदरम्यान धार रोडवर घडली. मंठा तालुक्यातील देवठाना, उस्वद, टाकळखोपा, वाघाळा, कानडी या पूर्णा नदी काठावरील गावातून मंठा महसूलच्या नियोजनशून्य कारभारामुळे राजेरोसपने दिवसरात्र रेती उपसा करून लोणार मार्गे चोरट्या मार्गाने रेती वाहतूक सुरु असल्याने तहसीलदार भूषण पाटील यांनी मंठा नाक्यावर महसूल पथक तैनात केले. दि. ३ मार्च रोजी सुसाट वेगाने ५-६ रेती वाहने मंठा नाक्यावरून जात असताना पथकातील तलाठी सचिन शेवाळे यांनी मंठा तालुक्यातील टाकळखोफा येथील प्रदीप किसनराव चाटे यांच्या मसलकीचे एम. एच. २१बी. एच. ६८३८ क्रमाकाचे टिप्पर दंडात्मक कारवाई साठी ताब्यात घेऊन पोलीस स्टेशनला लावले. १ लाख ४४ हजार रुपये दंड आकरण्यात आल्याची माहिती तलाठी शेवाळे यांनी दिली. एकच कर्मचारी असल्याने पथका समोरून वाहने निघून जाण्यात यशस्वी झाली. यावरून स्पष्ट होते कि शहरातून राजेरोसपने रेती वाहतूक सुरु असून पाहिजेत त्याप्रमाणे अवैध्य रेती वाढतुकीला पायबंद घातल्या जात नाही एवढे मात्र खरे..
त्या फरार झालेल्या वाहनांवर हि गुन्हा दाखल करण्यात यावा व कारवाई करण्यात

# सीकेटी महाविद्यालयात आंतर-महाविद्यालयीन सॉफ्टबॉल स्पर्धा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**




जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगु काना ठाकूर आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज न्यू पनवेल (स्वायत्त) आणि मुंबई विद्यापीठ यांच्या समन्वयाने आंतर महाविद्यालयीन सॉफ्टबॉल स्पर्धा दिनांक ५ व ६ मार्च रोजी आयोजित करण्यात आली असून या स्पर्धेचे सीकेटी कॉलेजचे प्राचार्य प्रो. डॉ. एस.के.पाटील यांच्या हस्ते झाले.
या स्पर्धेमध्ये ६ महाविद्यालयातील मुलींच्या ४ संघानी व मुलांच्या ६ संघांनी सहभाग नोंदविला आहे. आंतर महाविद्यालयीन सॉफ्टबॉल स्पर्धेमध्ये डी. जी. रुपारेल कॉलेज, माटुंगा, चांगु काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल, आर. ए. पोतदार कॉलेज, माटुंगा, विवेकानंद कॉलेज,चेंबूर, जी.एन. खालसा कॉलेज , माटुंगा आणि पिल्लई कॉलेज, न्यू पनवेल इत्यादी महाविद्यालये सहभागी झाली आहेत.
या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिमखाना विभागाचे चेअरमन डॉ. व्ही. बी. नाईक, सहसंचालक प्रा. अनिल नाक्ती व प्रा. प्रतिज्ञा पाटील, जिमखाना विभागाचे सर्व सदस्य यांनी विशेष मेहनत घेत आहेत.

# महाराष्ट्र शासन व सिडको यास मुंबई उच्च न्यायालयाचा दणका !

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ०४/०३/२०२५ रोजी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळकरीता जमिनीचे केलेले संपादन बेकायदेशीर असून कायद्याच्या तरतुदी प्रमाणे नसल्यामुळे भूसंपादन रद्द करत महत्वाचा निर्णय दिला आहे. सदरचा निकाल न्यायमूर्ती एम. एस. सोनक व न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांनी दिला. मौजे वहाळ तालुका पनवेल जिल्हा रायगड येथील जमिनीचे संपादना विरुद्ध श्री.अविनाश धावजी नाईक व इतर यांनी मुंबई उच्च न्यायालय येथे २०१७ साली याचिका वकील सचिन पुंडे रा. पनवेल व वकील कौस्तुभ पाटील रा.उरण यांच्या मार्फत दाखल केली होती. सदर शेतकऱ्यांनी सदरची याचिका महाराष्ट्र शासनाने व सिडकोने २०१३ च्या नवीन कायद्याच्या तरतुदीनुसार २०% विकसित भूखंड न दिल्यामुळे दाखल केली होती. सदर शेतकऱ्यांनी २०१३ च्या नवीन कायद्याच्या तरतुदीनुसार संपादित जमिनीचा चालू बाजारभाव प्रमाणे मोबदला व २०% विकसित भूखंड मिळावे या करिता महाराष्ट्र शासन व सिडकोकडे मागणी केली होती. सदर मागणीचा विचार न करता व त्यांची बाजू न ऐकता जमिनीचे संपादन केल्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाने सदरचे भूसंपादन रद्द करून सदर जमिनीवर वितरित केलेले भूखंड देखील रद्द केले व शेतकरीच जमीन मालक आहेत असे घोषित केले. *सदरच्या निकालामुळे आता शेतकऱ्यांना जमीन संपादनाकरिता जमिनीचा आर्थिक मोबदला तसेच २०% विकसित भूखंड मिळणार आहेत.* यामुळे सिडकोच्या २२.५% योजने बाबत प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. सदर २२.५% योजने मध्ये फक्त १६.७५% भूखंड वितरित करण्यात येतो व संपादित जमिनीकरिता कोणताही आर्थिक मोबदला दिला जात नाही.
*त्यामुळे नवीन भूसंपादन कायदा २०१३ प्रमाणे संपादित जमिनीचा चालू बाजार भाव प्रमाणे मोबदला व २०% विकसित भूखंड निश्चितच शेतकऱयांकरिता फायदेशीर ठरणार आहे.* असे अॅड.कौस्तुभ पाटील यांनी आमच्या प्रतिनिधी जवळ बोलताना आपल्या प्रतिक्रीया व्यक्त केल्या.




# रोजा सोडण्याची प्रक्रिया -इफ्तार




रमजान महिन्यात रोजे धरतांना पहाटे केले जाणारे जेवण अथवा कोणत्याही स्वरूपाचे खाणे पिणे हे सहेरी म्हणून संबोधले जाते तर सायंकाळी सूर्यास्तानंतर लगेचच उपवास सोडण्याची प्रक्रिया ही इफ्तार म्हणून ओळखली जाते.इफ्तार म्हणजे रोजा सोडणे. पहाटे सहेरी नंतर दिवसभर काहीही न खाता पिता रोजा धरला जातो.तर सायंकाळी रोजा इफ्तार केला जातो.यावेळी रोजेदाराची अवस्था पाहण्यासारखी असते. दिवसभर उपाशी राहून, कामधंदा करुन तो थकलेला असतो. शेवटच्या तासातील एक एक मिनट त्याला जड झालेला असतो.पण अल्लाहच्या आदेशाचे पालन केल्याचे समाधान त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत असते.इफ्तार पूर्वीची वेळ दुआ मागायची असते.घरी कुंटुंबासमवेत किंवा मशिदीत सामुहिक पणे दुआ मागितली जाते.
रोजा हा अल्लाह साठी असल्याने त्याच्याशीच दुआच्या माध्यमातून संवाद साधला जातो. प्रेषित हजरत मुसा अलैसलाम यांनी एक दिवस अल्लाहला प्रश्न केला कि हे परवर दिगार,मी तूझा पैगंबर असून तूझ्याशी थेट संवाद साधत असतो, माझ्यापेक्षा आणखी कुणी असा तूला जवळ आहे का ? अल्लाहने उत्तर दिले कि उम्मते मोहमदीमधील रोजेदार इफ्तार करण्यापूर्वी ज्यावेळी दुआ च्या माध्यमातून माझ्याशी संवाद साधतील तेव्हा ते तूझ्यापेक्षा ही माझ्याशी जवळ असतील. इफ्तारच्या वेळी मागितलेली दुआ कधी रद्द होत नाही म्हणून रोजा इफ्तार करण्यापूर्वी अत्यंत विनवणी पूर्वक परमेश्वराकडे दुआ मागितली पाहिजे.
इफ्तार प्रसंगी सर्वत्र रौनक काही औरच असते.बाजारात, चौकाचौकात इफ्तारसाठी खाद्यपदार्थ तसेच फळे घेण्याची धावपळ सुरू असते, घराघरात स्वयंपाकाची तयारी होत असते. खजूर,फळे,सरबत याबरोबरच वेगवेगळे खाद्यपदार्थ बनवले जातात.इफ्तार पूर्वी घरात दस्तरख्वान वर सर्व मांडले जातात. दुआ केली जाते.परंतु निर्धारित केलेल्या वेळेत एक मिनिट जरी बाकी असेल तरी कोणत्याही पदार्थाला किंवा पाण्याच्या पेल्याला हात लावला जात नाही याला तक्वा म्हणतात. अल्लाहच्या आदेशाचे पालन करणारा इतका स्वयंशिस्तीचा कायदा जगाच्या पाठीवर कुठेही नाही,जो इफ्तारच्या वेळी पाळला जातो.
इफ्तारसाठी मशिदीतून व्यवस्था केली जाते. बाहेरगावचे मुसाफिर, शहरातील रुग्णालयात अडमीट रुग्णाचे नातेवाईक यांच्या इफ्तारीची व्यवस्था मशिदीमध्ये केली जाते. अनेक लोक सवाब (पुण्य) मिळावा या भावनेने इफ्तारचे साहित्य आणून देतात. यात सर्वधर्मिय बांधव असतात.इफ्तारची सर्वात मोठी व्यवस्था मक्कामधील हरम शरीफ मध्ये केली जाते. जगातील सर्वच देशांचे प्रमुख रमजान महिन्यात इफ्तार पार्टीचे आयोजन करतात.व्हाईट हाऊस, क्रेमलीन पासून राजभवनापर्यंत ती दरवर्षी ती केली जाते व यातून परस्परांबद्दल स्नेह,आदर यांचा संदेश दिला जातो.(क्रमशः)
**सलीमखान पठाण**

# पी.एम.श्री.शाळा मुळेखंड उरण शाळेला मा.श्री. डॉक्टर इनामदार साहेब प्राचार्य डाएट यांची सदिच्छा भेट.

**दैनिक युवक आधार**
**रणिता ठाकूर उरण रायगड.**

आज बुधवार दिनांक 5 मार्च 2025 रोजी पी.एम. श्री रा.जि.प शाळा मुळेखंड या शाळेला डायट पनवेलचे प्राचार्य माननीय श्री डॉ.इनामदार साहेब तसेच ज्येष्ठ अधिव्याख्याते माननीय श्री कामशेट्टी सर, अधिव्याख्याते माननीय श्री तुपे सर तसेच विषय साधन व्यक्ती पंचायत समिती उरण मान .श्री मुकेश महाजन सर यांच्या पथकाने सदिच्छा भेट दिली. शाळेच्या परिसरात भेट देऊन समाधान व्यक्त केले. परसबागेचे कौतुक करून दगडावर देखील आपण हिरवळ करू शकतो याचा प्रत्यक्ष अनुभव या शाळेत मिळाला असे मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांमध्ये विद्यार्थी होऊन चर्चा केली हितगुज साधत प्रश्नोत्तरे विचारली मुलांनीही उत्तम प्रतिसाद दिला. शाळेतील नाविन्यपूर्ण उपक्रमांचे पाहणी करून त्याचे देखील कौतुक केले. शाळेची रंगरंगोटी सुरू असल्याने बरेचसे विद्यार्थी शालेय परिसरात आपापल्या कृतींमध्ये गटनिहाय सहभागी झाले होते. त्या सर्व गटांची पाहणी करून विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध नाविन्यपूर्ण प्रयोगांची पाहणी करून कार्यकारण भाव v वैज्ञानिक दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांची हितगुज साधले. संपूर्ण शाळेमधील सुरू



असलेल्या विविध कामाविषयी समाधान व्यक्त केले . नंतर सर्व शिक्षकांशी हितगुज साधत शाळेतील सुरू असलेल्या उपक्रमांविषयी सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले. तत्पूर्वी शाळेचे मुख्याध्यापक श्री.अमृत ठाकूर सर यांच्या हस्ते माननीय श्री. डॉक्टर इनामदार साहेब प्राचार्य डायट पनवेल यांचे गुलाब पुष्प व शाल देऊन स्वागत करण्यात आले. तसेच मा.श्री कामशेट्टी सर, मा.श्री. तुपे सर, मा.श्री महाजन सर यांचे देखील स्वागत करण्यात आले. सन्माननीय कामशेट्टी सर यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध आहोत. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी नाविन्यपूर्ण उपक्रमाबाबत सखोल मार्गदर्शन केले. शिक्षकांनी तयार केलेल्या शैक्षणिक साहित्य बाबत सर्व शिक्षक होतकरू व शाळेसाठी घेत असलेल्या मेहनतीबाबत अभिनंदन केले. माननीय श्री. डॉ इनामदार साहेब यांनी शिक्षकांनी 95 टक्के विद्यार्थी परप्रांतीय असून देखील या शाळेवर विद्यार्थ्यांमध्ये आपली मातृभाषा तसेच त्यांची भाषा यांचा समन्वय साधून कार्य करत आहेत त्याबद्दल सर्व शिक्षकांचे व मुख्याध्यापकांचे अभिनंदन केले. शाळा विविध एनजीओ कडून काम करून घेत असल्याबाबत समाधान व्यक्त केले. तसेच पी.एम. श्री अंतर्गत शाळेने वैशिष्ट्यपूर्ण परसबाग बनवल्याबद्दल विशेष कौतुक केले शेवटी शाळेत रोज येणाऱ्या व निरोगी असणाऱ्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. शाळेने तालुकास्तरीय पाककला कृती स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावल्या बद्दल श्रीमती जयवंती ठाकूर आई यांचे देखील गुलाब पुष्प देऊन अभिनंदन केले. एकंदरीत शाळेचा चढता आलेख पाहून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन उपक्रमशील शिक्षक श्री संजय होळकर सर यांनी केले